**ठळक बातम्या**

- आगामी विधान परिषद निवडणुकीत १७ पैकी महायुतीमधे भाजप ११, शिवसेना ४, तर राष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार /परभणी-हिंगोली मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून विवेक नवादार यांना उमेदवारी

- मराठा आरक्षणप्रश्नी मनोज जरांगे यांच्या मागण्यांवर सरकारनं कोणतंही नवं आश्वासन दिलं नसल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची स्पष्टोक्ती

- आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधून प्रतिपादन

- आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत

**आणि**

- सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीनं पटकावलं पुरुष दुहेरीचं विजेतेपद

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी महायुतीचं जागावाटप ठरलं असून १७ पैकी भाजपा ११, शिवसेना ४ आणि ऱाष्ट्रवादी काँग्रेस २ जागा लढवणार आहे.  भाजपा नागपूर, अहिल्यानगर, धाराशिव, जळगाव, सोलापूर, लातूर, नांदेड, अमरावती, वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि सातारा -सांगली या जागा लढवणार आहे. शिवसेना ठाणे, नाशिक, परभणी-हिंगोली आणि यवतमाळ तर राष्ट्रवादी काँग्रेस पुणे रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग या  जागा निवडणूक लढवणार आहे.

महाविकास आघाडीचं जागावाटपक दोन दिवसांपूर्वीच निश्चित झालं आहे. यानुसार काँग्रेस ८, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ४ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तीन  जागा लढवणार आहे. तर नाशिक आणि नांदेड या जागांबाबत अद्याप निर्णय झाला नाही.

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी विधानपरिषद निवडणुकीत परभणी हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं विवेक नवादार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी समाजमाध्यमावरून ही माहिती दिली. सध्या परभणी महानगरपालिकेत शिवसेनेचा महापौर आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा घटक पक्ष म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष रायगड, जळगांव, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि नाशिक या मतदारसंघातूनही निवडणूक लढवत आहे.

या निवडणुकीसाठी उद्या १ जून हा अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस आहे, तर मतदान आणि मतमोजणी २२ जून ला होणार आहे.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांना त्यांच्या मागण्या संदर्भात सरकारनं यापूर्वी दिलेली आश्वासनं सर्वांना माहीत असून कोणतंही नवं आश्वासन सरकारनं दिलं नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज अहिल्यानगर इथं बातमीदारांशी बोलत होते. महायुतीचं सरकार मराठा समाजाला न्याय देण्यासाठी सातत्यानं काम करत आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणा संदर्भातल्या मागण्यांसाठी जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं बेमुदत उपोषण सुरू केलं होतं. सरकारच्या प्रतिनिधींनी त्यांना १२ कलमी प्रस्ताव दिल्यावर काल रात्री त्यांनी उपोषण मागे घेतलं.

<><><><><>

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशतकोत्तर पहिल्या जयंतीनिमित्त आज त्यांना विविध कार्यक्रमातून आदरांजली वाहण्यात आली. राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांनी मुंबईत लोकभवन इथं अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात चौंडी इथं अहिल्याबाई होळकर स्मारकाला भेट देऊन  अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार , विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, मंत्रिमंडळाचे इतर सदस्य, तसंच राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यावेळी उपस्थित होते. चौंडी इथं आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे इत्यादी मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांना आदरांजली वाहिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाण्यात अहिल्यादेवी होळकर स्मारकाचं उद्घाटन झालं. यावेळी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना शिंदे यांच्या हस्ते धनगररत्न पुरस्कार प्रदान देऊन गौरवण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर इथं कोकणवाडी परिसरातल्या अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला विविध पक्ष संघटनांतर्फे अभिवादन करण्यात आलं. मुंबईत चर्चगेट रेल्वे स्थानकाजवळच्या अहिल्याबाईंच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.  सांस्कृतिक कार्य संचालनालयांच्या वतीनं आज मुंबईत अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं.

<><><><><>

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये विषारी दारू प्यायल्याने आतापर्यंत २४ जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य सरकारने याचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपवला आहे. तपासासाठी सीआयडीची पाच पथकं नियुक्त करण्यात आली आहेत. कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेऊन

पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातल्या काही अधिकारी-कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आलं आहे. प्राथमिक तपासानुसार, पुण्यात तयार केलेल्या विषारी दारूमध्ये मिथेनॉलचा वापर झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**<><><><><>**

आंबा उत्पादक देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या १३४ व्या भागात देशोदेशीच्या श्रोत्यांशी संवाद साधत होते. कोकणातल्या हापूसप्रमाणेच देशाच्या विविध भागात आढळणाऱ्या आंब्याच्या प्रकारांचा उल्लेख करुन त्यांनी आंबा उत्पादनाचा प्रवास गावखेड्यातून जागतिक बाजारपेठेपर्यंत झाला आहे असं सांगितलं.

देशाच्या अनेक भागात उष्णतेची लाट असून, त्यादृष्टीनं नागरिकांनी काळजी घ्यावी असं आवाहन त्यांनी केलं. कोकम सरबत, सोलकढी अशा पेयांचा उपयोग उष्णतेपासून बचावासाठी करावा असं ते म्हणाले. ही पेयं, देशाच्या विविध प्रदेशातल्या परंपरांचा अविभाज्य भाग आहेत, असं ते म्हणाले.

**-- होल्ड बाईट - MKB DESHI PEY - -**

अलिकडेच केलेल्या ५ देशांच्या दौऱ्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. नेदरलँड्स भेटीत ‘चोल’ साम्राज्य काळातला प्राचीन ताम्रपट भारताला परत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. केंद्र सरकार देशाच्या अशा अमूल्य वारशांचं जतन संवर्धन करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करत असल्याचं ते म्हणाले. छत्तीसगडमध्ये तीन दुर्मिळ ताम्रपटांचा शोध लागल्याची माहिती त्यांनी दिली.

क्रीडा क्षेत्रात भारतीय खेळाडूंनी अलिकडेच केलेल्या कामगिरीचा गौरव त्यांनी केला. अलिकडेच झारखंडमध्ये रांची इथं झालेल्या वरिष्ठ गटाच्या राष्ट्रीय ॲथलेटिक्स महासंघाच्या स्पर्धेत देशभरातून आठशे खेळाडू सहभागी झाले. या स्पर्धेत चार वेगवेगळ्या क्रीडाप्रकारांमध्ये चार राष्ट्रीय विक्रम मोडीत निघाले अशी

माहिती त्यांनी दिली. नवे विक्रम रचणारे गुरिंदरवीर सिंह, विशाल टीके, तेजस्विन शंकर, देव मीणा आणि कुलदीप कुमार या सर्व खेळाडूंचं त्यांनी अभिनंदन केलं. अवघ्या दोन दिवसांत पुरुषांच्या शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीचा राष्ट्रीय विक्रम तीन वेळा मोडीत निघाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. ही कामगिरी केलेल्या गुरिंदरवीर सिंह आणि अनिमेष कुजूर या दोन्ही खेळाडूंचं कौतुक करत त्यांच्याशी प्रधानमंत्र्यांनी थेट संवादही साधला.

भारतीयांच्या खगोलशास्त्राच्या आवडीबद्दल प्रधानमंत्र्यांनी आजच्या मन की बातमध्ये चर्चा केली. या निमित्तानं आपल्या वेधशाळांचे महत्त्व त्यांनी सांगितलं. तरुणांनी आकाश निरीक्षणाची आवड जोपासावी असं आवाहन त्यांनी केलं.....

नागरिकांनी आपल्या आसपासच्या अशा प्रयत्नांचा शोध घ्यावा, जे समाजासाठी चांगले काम करत आहेत त्यांची दखल घ्यावी - त्यांचं कौतुक करावं, त्यांच्याकडून शिकालं आणि शक्य असल्यास अशा काही चांगल्या कामात सहभागी व्हावं असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आता थोड्याच वेळात, साडे सात वाजता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स यांच्यात अंतिम लढत सुरु होईल. गुजरातमध्ये अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडिअमवर होत असलेल्या या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

सिंगापूर खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीचं विजेतेपद सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीनं जिंकलं आहे. अंतिम सामन्यात आज त्यांनी इंडोनेशियाचे मुहम्मद शोहिबुल फिक्री आणि फजर अलिफान या

जोडीचा १८-२१,२१-१७,२१-१६ असा पराभव केला. सात्विक- चिराग जोडीला गेली २ वर्षं विजेतेपदासाठी प्रतीक्षा करावी लागली होती.

<><><><><>

हिंगोली जिल्ह्यात काही ठिकाणी भूगर्भातून आवाजासह भूकंपाचा सौम्य धक्का जाणवला. वसमत, कळमनुरी आणि औंढा तालुक्यातल्या सुमारे २५ गावांत हे धक्के जाणवल्याचं आमच्या वार्ताहराने कळवलं आहे. या धक्क्यांची तीव्रता साडेतीन रिक्टर स्केल होती. या घटनेत जीवित किंवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, तसंच कोणतीही आपत्कालीन माहिती मिळाल्यास स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

<><><><><>

गेल्या २४ तासात राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त तापमान चंद्रपूर इथं ४४ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा, विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह गारांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//